महाराष्ट्र शासन

# सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, पुणे

**डॉ१०५/१०४.नं.य भवन सबाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्या., विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टेशनसमोर, येरवडा पुणे ०६**

दुरध्वनी व फॅक्स क्र.०२० २९७०६६११ E-mail:-acswopune@gmail.com

---

जा.क्र.सआसकपुणे/शिक्षण/भासशि/२०२५-२६/२७३३ दि. २५/०७/२०२५

प्रति,
अधिष्ठाता/संचालक / प्राचार्य / रजिस्ट्रार (सर्व),
कनिष्ठ/वरिष्ठ/व्यावसायिक/बिगर व्यावसायिक/तंत्र महाविद्यालय,
पुणे जिल्हा.

विषय - भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांना वितरीत होणारा प्रलंबित केंद्र हिस्सा ६०% बाबत.

संदर्भ - मा. सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, म.रा. पुणे यांचे पत्र क्र. १३४३१५४ दि. २५/०७/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विकसित करण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलवरुन मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी राज्यात करण्यात येते. केंद्र पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा ६०% हिस्सा केंद्र शासनाकडून व ४० % हिस्सा राज्य शासनाकडून प्रदान करण्यात येतो. केंद्र हिस्सा ६०% बाबत विद्यार्थी, पालक, महाविद्यालये व स्थानिक संघटना, लोकप्रतिनीधी यांचे कडून शासनास व आयुक्तालयास प्राप्त होणारा पत्रव्यवहार / निवेदने याबाबत करावयाची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे आहे.

**केंद्रशासनाकडून थेट विद्यार्थ्यांना वितरीत होणारा प्रलंबित केंद्रहिस्सा ६०% बाबत -**

I. केंद्रशासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडून भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती केंद्रहिश्याची अदायगी होत असताना उद्भवणाऱ्या अडचणींवर सविस्तर उपाययोजना विहीत केलेल्या आहेत.

II. अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिताच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचा केंद्र हिश्याचा (६०% दुसरा हप्ता) अदायगी करण्यात आलेल्या बाबतचा तपशिल महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध नसून दुसऱ्या हप्त्याची अदायगीची सद्यस्थिती स्वतंत्ररित्या अर्जनिहाय केंद्रशासनाच्या PFMS प्रणालीवरुन https://pfms.nic.in/Home.aspx या लिंकद्वारे विद्यार्थ्यांना / त्यांच्या संबंधित महाविद्यालयांना उपलब्ध करुन घेता येत आहेत.

III. केंद्रशासनाच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्रहिस्सा ६०% थेट विद्यार्थ्यांच्या आधार संलग्निकृत बँक खात्यामध्ये वितरीत होत आहे. तथापि, सदर केंद्रहिश्याची अदायगी प्रलंबित असल्याबाबत अद्यापही विद्यार्थी,

त्यांचे पालक, संबंधित महाविद्यालये व स्थानिक संघटना इ. यांचेकडून या कार्यालयास केंद्रहिश्याबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. मात्र सदर बाब ही केंद्रशासनाशी निगडीत असल्याने, तक्रारदारांना त्यांची तक्रार थेट PG Portal (Centralised Public Grievance) (https://pgportal.gov.in/Home/Lodge Grievance) वर नोंद करावयास सूचित करावे.

IV. तसेच केंद्रशासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडून सर्व राज्यशासनांना त्यांच्या अधिनस्त असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे बँक खाते थेट आधार संलग्निकृत करण्याकरिता अथवा विद्यार्थ्याच्या आधार संबंधित अडचणींचे निराकरण करण्याकरिता https://base.npci.org.in/catalog/homeScreen या प्रणालीचा वापर करण्याबाबत सूचित केले आहे., सदर बाबतची लेखी सूचना महाविद्यालयांतील सूचना फलकावर प्रदर्शित करावी तसेच समाज माध्यमाद्वारे विद्यार्थ्यांना कळविण्यात यावे.

उपरोक्त प्रमाणे नमूद केलेल्या सूचनांची तंतोतंत अंमलबजावणी करुन महाडीबीटी प्रणालीवरील चालू शैक्षणिक वर्ष तसेच मागील वर्षातील प्रलंबित अर्ज तात्काळ निकाली काढावेत जेणेकरुन राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती / फ्रिशीपचा लाभ चालू आर्थिक वर्ष अखेर पर्यंत अदा करता येईल. तसेच अर्ज नोंदणी व त्रुटीपूर्तता करिता विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना सूचना द्याव्यात.

उपरोक्त प्रमाणे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांबाबत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(विशाल मंगल अशोक लोंढे)

**सहायक आयुक्त,**

**समाज कल्याण, पुणे**

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

२. मा. प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, पुणे